महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

# वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपुर

जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ.समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४०००१

**दूरध्वनी : ०७१२ २५६१२४७** **ईमेल** directortextiles@rediffmail.com

---

जा.क्र.कार्या-५/वस्त्रो.धोरण/ भांडवली अनुदान पर्याय/ 3135 /२०२६, दिनांक: 22 MAY 2026

प्रति,

------------------------

संबंधित वस्त्रोद्योग घटक

**विषयः- ज्या वस्त्रोद्योग प्रकल्पाची उभारणी वस्त्रोद्योग धोरण, २०२१८-२३ मध्ये झाली असून, प्रत्यक्ष उत्पादन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ या धोरण कालावधीमध्ये सुरु झाले असेल, अशा घटकांनी भांडवली अनुदानाकरिता पर्याय सादर करणेबाबत.**

**संदर्भ**:- शासन पत्र क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि. २१ मे, २०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये, एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ च्या तरतुदींमध्ये करावयाच्या सुधारणाबाबत, मा. मंत्री (वस्त्रोद्योग) महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२ मे, २०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आयुक्तालयास प्राप्त झाले आहे. सदर इतिवृत्तानूसार, ज्या वस्त्रोद्योग घटकांनी त्यांच्या प्रकल्पाची उभारणी वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ या धोरण कालावधीमध्ये सुरु केले असेल आणि त्या प्रकल्पाचे उत्पादन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ या धोरण कालावधीमध्ये सुरु झाले असेल, अशा वस्त्रोद्योग घटकांना वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ किंवा एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ या दोन्ही धोरणांपैकी कोणत्या धोरणांतर्गत भांडवली अनुदानाचा लाभ घ्यावयाचा आहे, याबाबतची माहिती १५ दिवसाच्या आत मागवून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तरी, ज्या वस्त्रोद्योग घटकांनी त्यांच्या प्रकल्पाची उभारणी वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ या धोरण कालावधीमध्ये सुरु केले असेल आणि त्या प्रकल्पाचे उत्पादन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ या धोरण कालावधीमध्ये सुरु झाले असेल, अशा वस्त्रोद्योग घटकांना वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ किंवा एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ या दोन्ही धोरणांपैकी कोणत्या

धोरणांतर्गत भांडवली अनुदानाचा लाभ घ्यावयाचा आहे, याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यात भरुन, १५ दिवसाच्या आत म्हणजेच दि. ०८ जून, २०२६ पर्यंत वस्त्रोद्योग आयुक्तालयास/वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या commissionertex@gmail.com या ईमेल आयडीवर त्वरित सादर करावी. तसेच दि. ०८ जून, २०२६ नंतर प्राप्त होणाऱ्या विनंतीवर विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**संजय दैने (भा.प्र.से.)**
आयुक्त, वस्त्रोद्योग
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रपत्र अ:- भांडवली अनुदानाकरीता पर्यायाच्या निवडीबाबत माहिती

| वस्त्रोद्योग घटकाचे नाव | घटकाचा संपूर्ण पत्ता | घटकाचा संपर्क क्रमांक व ईमेल आयडी | घटकाचा प्रकार (Segment of unit) | पात्र यंत्रसामुग्रीची मुळ किंमत (रुपये लाखात) (Basic cost of Eligible Machinery) | कर्ज मंजूरी दिनांक (बँक अर्थसहाय्यित प्रकल्पांकरिता) | मशिनरी खरेदी दिनांक (स्व-अर्थसहाय्यित प्रकल्पांकरिता) | घटकाचे उत्पादन सुरु झाल्याचा दिनांक | वस्त्रोद्योग धोरण पर्याय<br>२०१८-२३ किंवा २०२३-२८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

दिनांक:-

Sign & Stamp of Unit